# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील बंधपत्र व कंत्राटी परिचारीकांच्या मागण्यांबाबत

**(१) ८५४८ (१७-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा बजावणाऱ्या राज्यातील परिचारीकांची रुग्णसंख्येनुसार पदभरती करावी, बंधपत्रित परिचारीकांना रूजू दिनांकापासून नियुक्ती द्यावी, कंत्राटी परिचारीकांना सेवेत समाविष्ट करून घ्यावे, सन २००५ नंतरच्या परिचारीकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या व अन्य मागण्यांसाठी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये राज्यव्यापी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासनही देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने परिचारीकांच्या मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०९-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) १. परिचारीका संघटनाच्या मागण्यांवर तात्कालीन मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांनी तपशीलवार चर्चा केली व त्यानुषंगाने राज्यातील परिचारीकांची रिक्त पदे दिनांक २८/०२/२०२१ रोजी सरळसेवा भरतीपरीक्षा घेण्यात आली मात्र पेपर फुटी प्रकरणी सन २०२१ ची पदभरती प्रक्रिया रद्द करण्यात आल्याने नव्याने पदभरती करण्यासाठी आयुक्तालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

२. सेवाप्रवेश नियमाच्या अधिन राहून दिनांक १५/०४/२०१५ नंतरच्या बंधपत्रित अधिपरिचारीकांना विशेष लेखी परीक्षा घेवून त्यांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत.

३. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी परिचारीकांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच परिचारीकांना कोरोना काळात आरोग्य कवच म्हणून ५० लाखाचा विमा काढण्यात आलेला आहे.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या बदलीच्या नियमानुसार बदल्या होणे आवश्यक आहे. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला बदल करता येत नाही.

५. सार्वजनिक आरोग्य विभगाने गट क संवर्गातील सेवाप्रवेश नियम अधिसूचित केले आहे व त्यानुसार पदोन्नत्यादेखील केलेल्या केलेल्या आहेत.

६. शुश्रृषा संवर्गासह इतर सर्वच संवर्गाच्या भत्यांबाबत बक्षी समिती शिफारस खंड दोन बाबत अंतिम निर्णय वित्त विभागाकडून निश्चित झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पभरणी येथील अस्थिव्यंग व स्त्री रूग्णालयातील तसेच जिल्हा रूग्णालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत

**(२) ९११८ (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील अस्थिव्यंग व स्त्री रूग्णालयातील तसेच जिल्हा रूग्णालयातील वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे गत २ महिन्यांपासूनचे वेतन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन कोविड योध्दे म्हणून दिवस-रात्र काम करणाऱ्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे २ महिन्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०९-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

परभणी येथील अस्थिव्यंग व स्त्री रूग्णालयातील तसेच जिल्हा रूग्णालयातील वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा नियमितपणे अदा करण्यात येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अर्धवेळ निमवैद्यकीय कर्मचारी यांना सेवेत पूर्णवेळ करून सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(३) ९८६४ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४२ अर्धवेळ निमवैद्यकीय कर्मचारी यांना सेवेत पूर्णवेळ करून सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करून फरक मिळणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागातून वित्त विभागामध्ये सादर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त विभागाद्वारे या प्रस्तावामध्ये त्रुटी काढण्यात येत असून त्रुटी दूर करून या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०९-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) उपजिल्हा रुग्णालय, दापोली येथे ४२ अर्धवेळ निमवैद्यकीय कर्मचारी नियुक्त अथवा कार्यरत नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली व परभणी जिल्हा परिषदेला मूलभूत सुविधेकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) १२१६० (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली व परभणी जिल्हा परिषदेला मूलभूत सुविधेकरीता अत्यंत अल्प प्रमाणात निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यांतून जाणाऱ्या राज्यमार्ग व इतर रस्त्यांकरीता अत्यंत कमी निधी देण्यात आला असल्यामुळे रस्त्यांची कामे व जिल्ह्यातील विशेषत: ग्रामीण भागातील मूलभूत सुविधेची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, गत तीन वर्षात हिंगोली व परभणी जिल्हा परिषदेला किती निधी देण्यात आला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हिंगोली व परभणी जिल्हा परिषदेला मूलभूत सुविधेकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) लेखाशीर्ष २५१५ १२३८ योजनेंतर्गत लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या कामासाठी निधी मंजूर करण्यात येतो. या योजनेंतर्गत राज्यमार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येत नाही.
(३) व (४) मागील ३ वर्षात हिंगोली व परभणी जिल्हा परिषदेला व सा. बां. विभागास २५१५ १२३८ योजनेंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या निधीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये लक्ष)

| आर्थिक वर्ष | परभणी जिल्हा | | | हिंगोली जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जि.प. यंत्रणा | सा.बां.वि. यंत्रणा | एकूण | जि.प. यंत्रणा | सा.बां.वि. यंत्रणा | एकूण |
| २०१८-१९ | ५४६०.०० | ६८८.० | ६१४८.०० | १४९५.०० | २०७५.०० | ३५७०.०० |
| २०१९-२० | १८८४.०० | ०.०० | १८८४.०० | ०.०० | ६९२.०० | ६९२.०० |
| २०२०-२१ | २२४७.०० | १००.०० | २३४७.०० | २००.०० | ६००.०० | ८००.०० |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोवाड नगरपरिषद (ता.नरखेड, जि.नागपूर) अंतर्गत मिनी स्टेडियम मध्ये प्रेक्षक गॅलरी बांधकामाकरीता आर्थिक अनुदान मिळणेबाबत

**(५) १२६८६ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोवाड नगरपरिषद (ता.नरखेड, जि.नागपूर) अंतर्गत मोवाड विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १० मिनी स्टेडियम मध्ये प्रेक्षक गॅलरी बांधकाम करणेकरीता सादर अंदाजपत्रकास सा.बा. विभागाकडून तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना नवि ६ (अ) योजनेंतर्गत आर्थिक अनुदान मिळणेबाबत नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामाकरीता मोवाड नगरपरिषदे ला आर्थिक अनुदान मंजूर करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-११-२०२२) :** (१) होय.

मंजूर विकास योजना, मोवाड मधील आ.क्र. १०, मिनी स्टेडियम मध्ये प्रेक्षक गॅलरीचे बांधकाम नकाशास सहायक संचालक नगर रचना, नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.१६२४, दिनांक २८/०६/२०१९ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे. सदर बांधकाम अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता सा.बा.मंडळ नागपूर यांनी पत्र क्र.४५१/तां/प्र.अ.४/२०२०, दिनांक ०६/०१/२०२० अन्वये मंजूरी दिलेली आहे.

(२) होय.

जिल्हा वार्षिक योजना नवि-६(अ) योजनेंतर्गत सदर कामासाठी आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद मोवाड यांनी सहायक संचालक, नगररचना नागपूर शाखा कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.५२०, दिनांक १२/०३/ २०२० अन्वये अनुदान स्वरुपात आर्थिक सहाय्य मंजूरीबाबत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नागपुर यांचेकडे शिफारस केलेली आहे.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे मोवाड नगर परिषदेस नवि-६ योजनेंतर्गत उक्त कामासाठी अर्थसहाय वितरीत करता येवू शकेल अशी शिफारस सहायक संचालक, नगररचना नागपूर शाखा कार्यालयाने नियोजन समिताकडे केलेली आहे. तथापि, जिल्हा वार्षिक योजनेतुन घेण्यात येणारे कामे ही योजनेचे निकषानुसार २ वर्षांचे कालावधीत पूर्ण करावयाची असल्याने व सुरु असलेल्या कामावर प्राधान्याने अर्थसहाय्य वितरित करावयाचे असल्यामुळे नगर परिषद, मोहपा यांचेकडील आ.क्र.२२, प्राथमिक शाळा बांधकामाकरीता अर्थसहाय्य मिळण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रुपये २.० कोटी (अनुदान) स्वरुपात आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. यामुळे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षी जिल्हा नियोजन समितीस मोवाड नगर परिषदेस अनुदान मंजूर करता येवू शकले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उमरेड (जि.नागपूर) येथील ऑक्सिजन प्लांट निर्मिती प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(६) १३२५२ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) (जि.नागपूर) परिसरात ऑक्सिजन प्लांट निर्मिती प्रकल्प मंजूर करून काम सुरू करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातून दर तासाला २०० क्यूबीक मीटर ऑक्सिजन निर्मिती केली जाणार असून या प्रकल्पाचे काम माहे नोव्हेंबर, २०२१ पूर्वी पूर्ण होणे आवश्यक असतानाही ते प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उमरेड लगत असलेल्या भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यातील गरजूंना या ऑक्सिजन प्लांट निर्मिती प्रकल्पाचा लाभ होवू शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोनाची तिसरी लाट आल्यामुळे आरोग्य सुविधा व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ऑक्सीजन अभावी बळींच्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उमरेड औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) (जि.नागपूर) परिसरात ऑक्सिजन प्लांट निर्मिती प्रकल्पाचे कामास दिरंगाई करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

उमरेड एम.आय.डी.सी. जि.नागपूर येथे क्रायोजेनिक ऑक्सीजन जनरेशन प्लान्ट प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहे. सदर प्रकल्पास विद्युत मीटर मिळाल्यानंतर जून २०२२ अखेर पर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे.
(२) होय, हे खरे आहे.

या प्रकल्पातून दर तासाला २०० क्युबिक मीटर ऑक्सिजन निर्मित केली जाणार आहे. सदर प्लांटकरीता पुरवठादार मेसर्स आर्क्टिक्ट इन्फ्राटेक सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांना दिनांक ०९/०६/२०२१ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक नागपूर यांच्या मार्फत वर्क ऑडर देण्यात आलेली होती.

सदर वर्क ऑडरच्या दिनांकपासून पुढील २ महिन्यामध्यें प्लांट डिलिव्हरी देणे व त्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत प्लांट इंस्टॉलेशन करणे अपेक्षित होते. सदर प्लांटकरीता उमरेड एम.आय.डी.सी. कडून जमिनीचा ताबा दिनांक २९/११/२०२१ रोजी देण्यात आला व त्यानंतर प्लांट उभारणीचे कार्य प्रत्यक्षात सुरु करणे शक्य झाले. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असून विद्युत मीटर मिळाल्यानंतर जून, २०२२ अखेरपर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(३) हे खरे आहे.

उमरेड येथील ऑक्सिजन जनरेशन प्लांट प्रकल्पाचा लाभ नागपूर व भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या नजिकच्या जिल्ह्यातील रुग्णांना होऊ शकतो.

(४) हे खरे नाही.

तिसऱ्या लाटेत कोविड बाधित रुग्णांपैकी रुग्णालयात भरती होणाऱ्या व त्यातही ऑक्सिजन, आय.सी.यु. व व्हेंटीलेटर खाटांवर भरती कराव्या लागणाऱ्या रुग्णांची संख्या अत्यंत कमी असल्याने ऑक्सिजनची कमतरता भासली नाही.

(५) उमरेड ऑक्सिजन जनरेशन प्लांटकरीता एम.आय.डी.सी. मधील प्रकल्पयोग्य जमीन अधिग्रहीत केल्यानंतर साधारणत: अपेक्षित कालावधीत प्रकल्प पूर्ण झालेला आहे. तसेच माहे जून २०२२ अखेरीस विद्युत पुरवठा सुरु झाल्यानंतर प्रकल्प कार्यान्वित केला जाईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समाजकल्याण विभागांतर्गत निवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेबाबत

**(७) १३६७५ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५७१ ला दिनांक १० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या निवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत कोणतीच कार्यवाही न झाल्याची बाब माहे मे,२०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या निवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलींच्या शासकीय निवासी शाळातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाच समावेश ७ व्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेमध्ये करण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिली असून, शासन

निर्णय दिनांक २०/०९/२०२१ अन्वये प्राथमिक प्रशिक्षित शिक्षक या संवर्गाची वेतनसंरचना सुधारीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय न्यायप्रविष्ट असल्यामुळे अधिसूचनेच्या प्रारुपातून प्राथमिक प्रशिक्षित शिक्षक संवर्ग वगळून अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही वित्त विभागाकडून करण्यात येत आहे.

---

## सांगली महानगरपालिका क्षेत्रात बेकायदा गुंठेवारी वाढत असल्याबाबत

**(८) १३७०२ (२५-०८-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका क्षेत्रातील दोन किलोमीटर परिघामधील हिरव्या पट्ट्यातील जमिनी पिवळया पट्ट्यात करण्याचा शासन निर्णय दिनांक २ डिसेंबर, २०२१ रोजी निर्गमित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली महानगरपालिका क्षेत्रात असणारे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे बेकायदा गुंठेवारीचे प्रकार वाढत असल्याची तक्रार मदन भाऊ युवा मंचाचे जिल्हाध्यक्षांनी जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाची सांगली नगररचना विभागाने अंमलबजावणी करावी अन्यथा जनआंदोलन करण्याचा इशारा मदन भाऊ युवा मंच सांगली यांनी शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील दोन किलोमीटर परिघामधील हिरव्या पट्ट्यातील जमिनी पिवळया पट्ट्यात करण्याचा शासन निर्णय दिनांक २ डिसेंबर, २०२१ रोजी निर्गमित केलला नाही. शासनाने दिनांक ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेन्वये, मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र/०५/१.१ नुसार महानगरपालिका हद्दीपासून २ किमी परिघस्त क्षेत्रातील शेती / ना-विकास विभागात वार्षिक मूल्यदर तक्त्यातील जमीन दराच्या १५ टक्के दराने अधिमूल्य आकारणीसह रहिवास वापर अनुज्ञेय आहे. अशा परिघस्त क्षेत्राकरीता प्रसिध्द अथवा मंजूर झोन प्लॅनमधील रस्त्यांचे जाळे किंवा संचालकांनी मान्यता दिलेल्या रस्त्यांचा आराखडा विचारात घेणे आवश्यक आहे.

(२) होय, हे खरे आहे.

श्री.आनंद लेंगरे, जिल्हाध्यक्ष, मदन भाऊ पाटील युवा मंचाचे जिल्हाध्यक्षांनी जिल्हाधिकारी, सांगली यांना दिनांक १९/०५/२०२२ रोजी सदर विषयी निवेदन दिले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मा.मदन भाऊ पाटील युवा मंच, सांगली यांनी सदर विषयी शासनास निवेदन दिल्याचे दिसून येत नाही. तथापि, दिनांक ०२/१२/२०२० च्या निर्णयानुसार, सहायक संचालक, नगर रचना, सांगली यांनी सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका हद्दीपासून २ किमी क्षेत्राकरीता Road Network Plan तयार

करुन विहित मार्गाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मंजूरीसाठी सादर केला आहे. त्यांचे मंजूरीनंतर शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समता प्रतिष्ठान मार्फत राबविलेल्या सामाजिक उपक्रमांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९) १३७८७ (२५-०८-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त बार्टीच्या समता प्रतिष्ठान मार्फत राबविलेल्या सामाजिक उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अद्यापपर्यंत निलंबनाव्यतीरिक्त कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर १४ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे मान्य करुन एसआयटीमार्फत चौकशीचे आश्वासन सामाजिक मंत्री महोदयांनी देऊनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याची बाब दिनांक ९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एक वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप आश्वासनाची पुर्तता न करण्याची कारणे काय आहेत, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१), (२) व (३) याबाबत चौकशी करण्याकरीता प्रधान सचिव (सा.न्या. व वि.स.) यांचे स्तरावर समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून शासन मान्यतेनंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रामेटाकळी (ता.मानवत, जि.परभणी) येथील तीन कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(१०) १३८३६ (२५-०८-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामेटाकळी (ता.मानवत, जि.परभणी) येथील तीन कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामामध्ये विविध नियम भंग केल्या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, जलसंधारण विभाग, परभणी यांनी चौंडेश्वरी कन्स्ट्रक्शन यांना सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी नोटीस जारी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदार अधिकाऱ्यांना धाक दाखवून देयके वसूल करुन शासनाचे नुकसान करत असल्याबाबतची लेखी तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे सन २०२२ दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदाराविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) रामेटाकळी को.प. बंधारा क्र. ३ या योजनेच्या संबंधित कंत्राटदाराने उपविभागाकडून कामाची आखणी करून न घेता परस्पर काम सुरु केल्यामुळे ते बंद करण्यात आले असून संबंधित कंत्राटदारास निविदा अटी व शर्तीनूसार नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदाने उपविभागकडून पुन:श्च कामाची आखणी करून घेवून त्यानूसार काम चालू केले आहे. संबंधित कंत्राटदाराने परस्पर चालू केलेल्या खोदकामाचे बिल अदा करण्यात आलेले नसल्याने शासनाचे कोणतेही आर्थिक नूकसान झालेले नाही. त्यामुळे कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंडपिपरी नगर पंचायत (जि.चंद्रपूर) अंतर्गत सिमेंट रस्ते व नाली बांधण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११) १४०९८ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंडपिपरी नगर पंचायत (जि.चंद्रपूर) अंतर्गत रुपये ४३ लक्ष चे सिमेंट रस्ते व नाली बांधकामाचे कंत्राट सुफी कनस्ट्रक्शन या कंपनीला देण्यात आले असून सदरहू काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक ४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२३) :** (१) व (२) गोंडपिपरी नगरपंचायत अंतर्गत सिमेंट रोडचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक वर्तमानपत्रामध्ये बातमी दिनांक ४ मे, २०२२ रोजी प्रसिध्द झाल्याचे दिसून आले आहे.

सदरच्या कामाबाबत शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर यांच्याकडून तांत्रिक तपासणी करुन घेण्यात आली असून तपासणी लेखापरीक्षण अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याचे नगरपंचायतीचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातून ई-बस धावण्यासाठी चार्जिंग स्टेशन सुरु करणेबाबत

**(१२) १४३३५ (२५-०८-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने दिनांक १ जून, २०२२ पासून इलेक्ट्रिक बस राज्यातील विविध विभागांमध्ये चालवण्याचा निर्णय घेतला असून यात सोलापूर जिल्ह्यातून सोलापुर-पुणे व सोलापूर-विजापूर या मार्गावर ई-बस धावणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-बस साठी पुणे विभागातील स्वारगेट येथे चार्जिंग स्टेशन पूर्ण झाले परंतु सोलापूर आगारातील चार्जिंग स्टेशन महावितरण व महानगरपालिका यांची परवानगी न मिळाल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर आगारातील चार्जिंग स्टेशन त्वरित सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातून सोलापूर-पुणे या मार्गावर काही नियते ई-बसद्वारे चालविण्याचे प्रस्तावित आहे. तथापि,सोलापूर-विजापूर या मार्गावर ई-बस चालविण्याचे अद्याप कोणतेही नियोजन करण्यात आलेले नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सोलापुर येथील चार्जिंग स्टेशनसाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेली आहे. निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात गरजेपोटी घरासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कात कपात करणेबाबत

**(१३) १४४२४ (२५-०८-२०२२) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गरजेपोटी घरे नियमित करण्यासाठी शासनाने आदेश काढला असून यासंदर्भात अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० मे, २०२२ होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरजेपोटी घर नियमित करण्यासाठी अनेक प्रकल्पग्रस्तांनी अर्ज सादर केले असून त्यापोटी भरावे लागणारे शुल्क जादा असल्याकारणाने गरजेपोटी घरांचे शुल्क कमी करण्याबाबत शासनाचे प्रकल्प आघाडीचे पदाधिकारी यांनी सिडकोचे व्यवस्थापक यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गरजेपोटी घरासाठी आकारण्यात येणारे शुल्क कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी रहिवासी प्रयोजनार्थ केलेल्या नियमितीकरणासंदर्भात शासन निर्णय दिनांक २५/०२/२०२२ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांनी अर्ज सादर करण्यास सिडकोने जाहीर सूचनेद्वारे आवाहन केले असून, अर्ज सादर करण्यास दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.
(३) यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## नागपूर विभागीय एस.टी. महामंडळाव्दारे सरळ सेवा भरतीने निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याबाबत

**(१४) १४८२७ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागीय एस.टी. महामंडळाव्दारे सन २०१९ मध्ये सरळ सेवा भरतीने ३५० कंत्राटी चालक व वाहक पदावर निवड करण्यात आलेल्या २५० उमेदवारांना अद्याप नियुक्तीपत्र देण्यांत आले नसल्याचे दिनांक १९ मे, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर नियुक्ती झालेल्या कंत्राटी वाहक व चालकांना महामंडळ नियुक्तीपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## ऐरोली (नवी मुंबई) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी आयोजित कार्यक्रमात नवी मुंबईतील महानगरपालिकेने केलेल्या खर्चाची चौकशी करण्याबाबत

**(१५) १४९३३ (२५-०८-२०२२) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐरोली (नवी मुंबई) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी आयोजित कार्यक्रमात नवी मुंबई महानगरपालिकेने चहा-नाश्ताकरिता रुपये १४ लाख ५८ हजार ५०० खर्च केल्याचे दिनांक ९ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन महिन्यांपूर्वी झालेल्या या कार्यक्रमासाठी केलेल्या चहा नाश्ताच्या खर्चाची निविदा प्रक्रिया महानगरपालिका प्रशासनाने सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चहा नाश्तावर झालेल्या रुपये १४ लाख ५८ हजार ५०० खर्चाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१), (२) व (३) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली से.१५ येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे लोकार्पण दिनांक ०५/१२/२०२१ झाले आहे.

- त्याअनुषंगाने दिनांक ३०/०३/२०२२ व दिनांक १४/०४/२०२२ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त "जागर २०२२" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
- "जागर २०२२" निमित्त लहान मुलांची चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर दिवशी चित्रकला स्पर्धेतील निवडक चित्रांच्या प्रदर्शनांचे तत्कालीन मा.मंत्री (नगरविकास) महोदयांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते.
- ऐरोली से.१५ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकास दिनांक १२/०४/२०२२ रोजी भेट देणाऱ्या सन्मानीय व नागरिकांना अल्पोपहार पुरविणेकामी रुपये १,९७,२००/- इतका खर्च झालेला आहे.
- ऐरोली से.१५ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येच्या दिनांक १३/०४/२०२२ रोजी ६८०० नागरिकांनी भेटी दरम्यान अल्पोपहार केला असून, रुपये ४,७७,४७०/- इतका खर्च झालेला आहे.
- ऐरोली से.१५ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येच्या दिनांक १४/०४/२०२२ रोजी ९६८० नागरिकांनी भेटी दरम्यान अल्पोपहार केला असून, रुपये ४,७६,७१०/- इतका खर्च झालेला आहे.
- सदर प्रकरणी निविदा प्रकरणी पूर्ण झालेली आहे. तथापि, सदर खर्चाचे देयक अद्याप अदा करण्यात आले नसल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगर पंचायत मौदा मधील सर्वे क्र. ४४८/४ च्या हद्दीतील अतिक्रमण हटविणेबाबत

**(१६) १४९४४ (२६-०८-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर पंचायत मौदा मधील सर्वे क्र. ४४८/४ हद्दाच्या भागामधील पावडदौना रस्त्याचे बाजुला अतिक्रमण करून अवैध मास विक्रीचे दुकान सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमीत जागा ही नगर पंचायत हद्दीत येत नसल्याबाबत २३/१२/२०२१ ला नं.प. मुख्याधिकारी यांनी दिनांक १७/०२/२०२२ ला पत्रान्वये हद्दीत येत असल्याबाबत कळविले आहे त्यामुळे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही ही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर पंचायतच्या क्षेत्रातील जागा असूनही व नागरिकांची तक्रार असूनही नगर पंचायत मुख्याधिकारी यांनी कुठलीही कार्यवाही न केल्यामुळे नागरिकांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित जागेवरील अतिक्रमण दूर करणेबाबत तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत मौदा यांनी केलेल्या कामचुकारपणावर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२३) :** (१) नगरपंचायत मौदा सर्वे क्रमांक ४४८/४ अंतर्गत ही जागा श्री.राधेश्याम देवराम वैद्य यांच्या खाजगी मालकीची असून त्यावर अतिक्रमण करुन श्री.रमेश अंबादास लारोकर व इतर ३ यांचे मटनाचे दुकान असल्याचे दिसून आले आहे.

(२), (३) व (४) यासंदर्भात मुख्याधिकारी यांच्या अहवालानुसार सदर जागा नगरपरिषदेच्या मालकीची नाही. तथापि, सदर जागा नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये आहे असे नमूद केल्याचे स्पष्ट होते.

सदर जागेवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत मूळ खाजगी मालकांची विनंती असून त्यांच्या बाजूला असलेल्या सर्वे क्रमांक ४५५ व ४५६ या शासकीय जागेवर देखील अतिक्रमणे असल्याचे दिसून आल्याने खाजगी जागेसह शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासनाबाबत महसूल विभाग व नगरपंचायत यांच्याकडून कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) १४९५८ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या आकृतीबंधानुसार ११ हजार ४०१ पदे मंजूर असून सध्या ७ हजार १६२ अधिकारी व कर्मचारी आस्थापनेवर कार्यरत तर उर्वरित ४ हजार २३९ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक महिन्याला कर्मचारी सेवानिवृत्त होत असून पद भरती बंद असल्याने रिक्त पदांची संख्या ७५ टक्के होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेत एकूण ११४०४ पदे (शिक्षण विभागाच्या संच मान्यतेच्या अनुषंगाने) मंजूर असून माहे ऑगस्ट, २०२२ अखेर ७०२० इतकी पदे कार्यरत असून ४३८४ इतकी पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, महानगरपालिकेमध्ये दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ नुसार एकूण रिक्त पदांची स्थिती ३८.४५ टक्के इतकी आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामठी (जि.नागपूर) नगरपरिषदेच्या भुयारी गटर योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) १४९८६ (२०-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि.नागपूर) नगरपरिषदेच्या भुयारी गटर योजनकरीता रुपये २२ कोटी २१ लक्ष रकमेस दिनांक ३१ मार्च, २००९ रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम करणाऱ्या कंपनीला ही योजना पूर्ण करण्याकरीता दोन वर्षाची मुदत व पुन्हा मुदतवाढ देण्यात येवूनही भुयारी गटर योजनेचे काम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुपये २२ कोटींची योजना रुपये ३० कोटींची होण्याबाबत तथा भुमीगत गटर योजनेत सन २०१० ते २०१५ पर्यंत झालेल्या आर्थिक अनियमिततेबाबत ऑडिट करण्याबाबत दाखल झालेल्या तक्रारीनुसार लेखापरिक्षण विभागाने रुपये ७ कोटी पेक्षा अधिक रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, योजनेचे काम रखडल्याप्रकरणी तसेच आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत लोकायुक्ताकडे तक्रारी असूनही दोषींवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने योजनेच्या कामात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(४) व (५) कामठी नगरपरिषदेची भुयारी गटार योजना विहित कालावधीत पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, अशी श्री.संघपाल वासूदेव गौरखेडे यांनी मा.लोकआयुक्त यांच्याकडे तक्रार केली असून सदरच्या तक्रारीसंदर्भात मा.लोकआयुक्त यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजी व त्यानंतर घेण्यात आलेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार भुयारी गटार योजना पूर्ण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

याबाबत मा.लोकआयुक्त यांच्याकडे पुढील सुनावणी दिनांक १२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुलीभंजन-नंद्राबाद (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्याबाबत

**(१९) १५३४२ (२८-१२-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सन २०१६ मधील आराखड्यात सुलीभंजन-नंद्राबाद (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आरोग्य उपकेंद्र स्थापन झाल्यास परिसरातील १० गावातील ग्रामस्थांना औषधोपचार व वैद्यकीय सेवेचा लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुलीभंजन पर्यटन स्थळ असूनही पर्यटक व स्थानिकांना आरोग्य सुविधा व आवश्यक दैनंदिन सुविधा नसल्याने पर्यटकांची संख्या कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर पस्तावित उपकेंद्राच्या अंतर्गत ०४ गावांचा समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) नंद्राबाद-सुलीभंजन पासून ०४ किमी अंतरावर उपकेंद्रे सराई व ०७ किमी अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ कार्यरत असून याच्यामार्फत तेथील जनतेला सेवा देण्यात येतात.
(४) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोड बृहतआराखड्याद्वारे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे मंजूर करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील परिचारिकांची बोगस पध्दतीने नोंदणी करण्यात आल्याबाबत

**(२०) १६३२१ (२९-११-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने नोंदणीकृत केलेल्या नर्सेसच्या कागदपत्रांची तपासणी न करता सुमारे ३७,००० बोगस नर्सेसची नोंदणी करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर गुणपत्रिकेच्या आधारावर या नर्सेसची नोंदणी केली आहे काय, तसेच ज्यांनी कोरोना काळात रुग्ण सेवा दिली, त्या ३७ हजार परिचारिकांना बोगस ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आहे काय, तसेच सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१५-१२-२०२२) :** (१) नाही.
(२) नाही, संबंधित परिचारिकांना बोगस ठरविण्यात आले नसून परिचारिकांच्या महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील नोंदणी प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) होय, शासनाने महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी दिनांक १४/१०/२०२२ रोजी सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली असून सदर समितीकडून चौकशी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.